# जिल्हा परिषद, वाशिम

जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट क सरळसेवा संवर्गाची दिव्यांग या प्रवर्गामध्ये आरक्षण ३ % वरुन ४ टक्के निर्णय झाल्याने जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

जाहिरात २५४३/२०२१ दि. २५/०८/२०२१

जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत आरोग्य विभागामधील, सरळसेवा गट क या संवर्गामधील रिक्त पदांची जाहिरात क्र.०१/२०१९ दि.०२/०३/२०१९ नुसार प्रसिद्ध करण्यात आली होती.परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदर ची परिक्षा प्रक्रीया पुर्ण होवु शकली नाही.दरम्यान कोविड-१९ या साथरोगाच्या पाश्वभुमीवर तसेच इतर साथरोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागाअंतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधीत औषध निर्माता, आरोग्य सेवक पुरुष (४०%), आरोग्य सेवक पुरुष (५०%) हंगामी फवारणी कर्मचारी आणि आरोग्य सेवक (महिला) मध्ये अपंग प्रवर्गाकरीता ३ % आरक्षणानुसार दिव्यांगाची पदे निश्चित करुन जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.सदर आरक्षणात ३ टक्के ऐवजी ४ टक्के नुसार दिव्यांगाची आरक्षणाची पदे निश्चित करण्यात आली आहेत.त्याचप्रमाणे सामाजीक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी)आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये रुपांतरीत झाल्या असल्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये बदल झाल्यानुसार पदे निश्चित करुन जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारीत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">संवर्ग</th><th colspan="8">दिव्यांगासाठी राखीव असलेली एकुण पदे</th><th rowspan="2">गट</th><th rowspan="2">दिव्यांगाचा प्रकार</th><th rowspan="2">राखीव पद संख्या</th></tr>
<tr><th colspan="8">खुला</th></tr>
<tr><td>१</td><td>औषध निर्माता</td><td colspan="8">०१</td><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता D(Deaf) / HH (Hard of Hearing).</td><td>०१</td></tr>
<tr><td colspan="13">दिव्यांग:-सन २०१९ च्या जाहिरातीनुसार व दिव्यांगाच्या आरक्षणात बदल झाल्यानुसार एकुण रिक्त ०३ पदापैकी ०१ पद दिव्यांग उमेदवारासाठी राखीव राहील. महा. शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि.२२/०२/२०२१ नुसार औषध निर्माता या पदाकरीता कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता या दिव्यांग प्रकाराकरीता राखीव.</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">आरोग्य सेवक पु. ५०%</td><td>अजा</td><td>अज</td><td>इमाव</td><td>विमाप्र</td><td colspan="2">ई.डब्लु.एस</td><td colspan="2">खुला</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी Low Vision</td><td>०१</td></tr>
<tr><td colspan="8">०२</td><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता D(Deaf) / HH (Hard of Hearing)</td><td>०१</td></tr>
<tr><td colspan="13">दिव्यागः- सन २०१९ च्या जाहिरातीनुसार व दिव्यांगाच्या आरक्षणात बदल झाल्यानुसार एकुण रिक्त ३१ पदापैकी ०२ पदे दिव्यांग उमेदवारासाठी राखीव राहील. महा. शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि.२२/०२/२०२१ नुसार आरोग्य सेवक पु. ५० % या पदाकरीता वरील प्रमाणे दिव्यांग प्रकाराकरीता राखीव .</td></tr>
<tr><td rowspan="3">३</td><td rowspan="3">आरोग्य सेवक (महिला)</td><td>अ जा</td><td>अ ज</td><td>विजा अ</td><td>भज ब</td><td>भज क</td><td>इमाव</td><td>ई.डब्लु. एस</td><td>खुला</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी Low Vision</td><td>०२</td></tr>
<tr><td colspan="8" rowspan="2">०५</td><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता D(Deaf) / HH (Hard of Hearing)</td><td>०१</td></tr>
<tr><td>क</td><td>एका पायाने OL One leg,<br>मेंदुचा पक्षघात CP (Cerebral palsy),<br>कुष्ठरोग मुक्त LC(Leprosy Cured),<br>शारिरीक वाढ खुंटणे DW (Dwarfism),<br>आम्ल हल्लाग्रस्त AAV (Acid Attack Victims)</td><td>०१</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ड | विशिष्ट शिक्षण अक्षमता SLD Specific learning Disability मानसीक आजार MI Mental Illness | ०१ |
| | | | इ | वरील अ ते ड मधिल बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी MD Multiple Disabilities Involving (a) to (d) Above | |
| दिव्याग:- सन २०१९ च्या जाहिरातीनुसार व दिव्यांगाच्या आरक्षणात बदल झाल्यानुसार एकुण रिक्त ७७ पदापैकी ०५ पदे दिव्यांग उमेदवारासाठी राखीव राहील. महा. शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि.२२/०२/२०२१ नुसार आरोग्य सेवक (महिला) या पदाकरीता वरील प्रमाणे दिव्यांग प्रकाराकरीता राखीव. | | | | | |

**अटि व शर्ती:-**

१. वरील प्रमाणे दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज सादर करावे.

२. केंद्र शासनाच्या दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगासाठी ४ टक्के आरक्षण निश्चीत करण्यात आले आहे. त्यानुसार जाहीरातीमध्ये वरील प्रमाणे दिव्यांगाची पदे निश्चीत करण्यात आलेली आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापुर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देण्याचा कालावधी सुद्धा **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** पर्यंत राहील.

३. या जाहिरातीप्रमाणे उमेदवारांसाठी (वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता व इतर) यापुर्वी सन २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेली जाहिरात क्रमांक-१/२०१९ दिनांक ०२/०३/२०१९ मधील अटी व शर्ती कायम राहतील.

४. मार्च २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित रिक्त पदाकरीता देण्यात आलेल्या जाहीरातीमधील एसईबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेली पदे अराखीव प्रवर्गात रुपांतरीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार खुल्या प्रवर्गातील वाढीव पदे निश्चीत करण्यात आली आहे.

५. सामाजीक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थीक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गातुन (ईडब्लुएस) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छीक असेल. यानुसार संबंधित उमेदवारांना परिक्षेपुर्वी ईडब्ल्युएस किंवा खुल्या प्रवर्गाबाबत विकल्प प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील. उमेदवारांने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकाराचा बदल करता येणार नाही. तथापी ज्या एसईबीसी प्रवर्गातील उमेदवाराने ईडब्ल्युएस प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्यांना परिक्षेपुर्वी ईडब्ल्युएस प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. जे सामाजिक व शैक्षणीक दृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थीक दृष्ट्या मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाही. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणुन ग्राह्य धरण्यात येईल. तसेच सदर उमेदवारांना खुल्या प्रवर्गात घेतांना खुल्या प्रवर्गासाठी असलेली वयोमर्यादा तसेच परिक्षा शुल्क लागु राहील. खुल्या प्रवर्गासाठी विकल्प दिलेल्या तसेच खुल्या प्रवर्गात गणना होणाऱ्या एसईबीसी प्रवर्गातील जर संबंधित उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या वयोमर्यादेतुन पात्र ठरत असेल तर त्यास खुल्या प्रवर्गासाठी असलेले परिक्षा शुल्क अदा करणे आवश्यक राहील.

७. पाच (५) संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधुन परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदाकरीता अर्ज सादर केले आहेत अशा **उमेदवारंनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.**

८. सदर जाहिरातीप्रमाणे उमेदवारांनी www.maharddzp.com संकेत स्थळावर त्यांचे अर्ज तसेच विकल्प **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीत सादर करावेत.

९. सरळसेवा भरती संदर्भातील सन २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीनुसार संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचुन ऑनलाईन पद्धतीनेच आपले अर्ज सादर करावे.

१०. वरिलप्रमाणे भरती प्रक्रीयेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासनस्तरावर राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

**(ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्रक्र.९९/आस्था-८ दिनांक २० ऑगस्ट २०२१ चे सहपत्र)**

## विवरणपत्र - अ

## जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती बाबत जाहिर प्रकटन

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थीतीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पुर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड १९ साथ रोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामिण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे मार्च २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीमधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय शासन निर्णयानुसार घेण्यात आलेला आहे. सदर जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदाचा सुधारित तपशिल खालील प्रमाणे:-

**शासनपत्र दि.२५/०६/२०२१ अन्वये सामाजीक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी)आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गात समांतर आरक्षणात बदल होत असल्याने खुल्या प्रवर्गातील समांतरआरक्षणात वाढीव पदांची जाहिरात**

१. औषध निर्माता:- एकुण रिक्त पदसंख्या- ०३

| अ.क्र | समांतर आरक्षण | एकुण रिक्त पदे | अजा. | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | खुला सर्वसाधारण | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| ०२ | खुला (महिला) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ०३ | एकुण | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ |

दिव्यांग:-सन २०१९ च्या जाहिरातीनुसार व दिव्यांगाच्या आरक्षणात बदल झाल्यानुसार एकुण रिक्त ०३ पदापैकी ०१ पद दिव्यांग उमेदवारासाठी राखीव राहील. महा. शासन निर्णय ग्रामविकास विभाग दि.२२/०२/२०२१ नुसार औषध निर्माता या पदाकरीता कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता या दिव्यांग प्रकाराकरीता राखीव.

२. आरोग्य सेवक (पुरुष) ४०%:- एकुण रिक्त पदसंख्या- ०१

| अ.क्र | समांतर आरक्षण | एकुण रिक्त पदे | अजा. | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | इडब्लुएसं | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | खुला (सर्वसाधारण) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ०२ | एकुण | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |

३. आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी कर्मचारी :- ०१

| अ. क्र | समांतर आरक्षण | एकुण रिक्त पदे | अजा. | अज | विजा अ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | खुला (खेळाडु) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ०२ | एकुण | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |

वरिल प्रमाणे सुधारित पदनिहाय आरक्षनिहाय रिक्त पदाचा तपशील नमुद करण्यात आलेला आहे.

**माहे मार्च २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदाकरीता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे:-**

१. मार्च २०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधित पदाकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जावुन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.

२. माहे मार्च २०१९ मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरीता आवेदन पत्र/ अर्ज सादर केलेल्या उमेदवारापैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराव्यतिरिक्त इतर प्रवर्गातुन अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधित प्रवर्गातुन परिक्षेकरिता पात्र राहतील.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचीका क्र. १५७३७/२०१९ व इतर याचीका मध्ये शासकिय नोकऱ्यामधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थीक दृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्रक्र.३१/१६-अ दि.२३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गाचे (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थीक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गातुन (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थीक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरील प्रमाणे नमुद संकेत स्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीत विकल्प द्यावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापी ज्या एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने ईडब्लुएस (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे. त्याने परिक्षेपुर्वी सक्षम अधिकाऱ्याचे ईडब्लुएस (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे ईडब्लुएस (EWS) प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

४. जे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार आर्थीक दृष्ट्या मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाही तथापी खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरीता पात्र आहेत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणुन गणन्यात येईल.अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागु असलेले परिक्षा शुल्क (यापुर्वी एसईबीसी प्रवर्गातुन अदा केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम) परिक्षेपुर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीत वरील प्रमाणे नमुद संकेत स्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

५. माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षकरीता उमेवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती OMR Vendor मार्फत Offline पद्धतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदामध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधुन परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेवाराने एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदाकरीता अर्ज सादर केले आहेत अशा उमेदवारंनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

६. नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापुर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापुर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगाकरिता नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

७. यापुर्वी उमेदवाराकडुन लेखी परिक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परिक्षा केंद्रामधुन परिक्षा देणार आहे, त्या परिक्षा केंद्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदावारास संबंधित जिल्ह्यातुन परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

८. माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता एका पदाकरिता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदेकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परिक्षा शुल्क भरलेले आहे. तथापी उमेदवारांना एकाच ठिकाणची परिक्षा देता येणार असल्याने संबंधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे परिक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी वरील प्रमाणे नमुद संकेत स्थळावर आवश्यक बँक तपशिल नमुद करणे आवश्यक आहे.

९. विकल्प नोंदवितांना काहि अडचणी उद्भवल्यास उमेदवारांनी ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनी/ दुरध्वनीवर संपर्क साधावा.

वरील प्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखुन ठेवण्यात येतील.

**सदस्य सचिव तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

**सदस्य**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)**
**जिल्हा परिषद वाशिम**

**अध्यक्ष/जिल्हा निवड समिती**
**तथा**
**जिल्हाधिकारी वाशिम**

**(ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२०/प्रक्र.९९/आस्था-८ दिनांक २० ऑगस्ट २०२१ चे सहपत्र)**

**विवरणपत्र - ब**

जिल्हा परिषद वाशिम कडील आरोग्य विभागाशी संबंधित औषध निर्माता आरोग्य सेवक पु. आरोग्य सेविका या संवर्गातील पदभरती करीता पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल.

वेळापत्रक

| अ.क्र. | उमेदवारांना सुचना | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | **माहे मार्च २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांबाबत:-** एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवाराकडुन जिल्ह्याचा विकल्प घेणे/ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गाच्या (एसईबीसी) उमेदवाराकडुन विकल्प प्राप्त करुन घेणे/ सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (एसईबीसी) उमेदवाराकडुन प्राप्त विकल्पानुसार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देणाऱ्या/ खुल्या प्रवर्गात गणना होणाऱ्या खुल्या प्रवर्गासाठीच्या वयोमर्यादेत पात्र होणाऱ्या एसईबीसी उमेदवाराकडुन परिक्षा शुल्क आकारणे/ ज्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास उमेदवारांनी ईडब्ल्युएस प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्यांच्याकडुन इडब्ल्युएस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे दिव्यांगाच्या आरक्षणात बदल होत असल्याने सादर केलेल्या दिव्यांग उमेदवाराकडुन नव्याने निश्चित केलेल्या दिव्यांग आरक्षणानुसार विकल्प घेणे/ नव्याने समाविष्ट दिव्यांग उमेदवाराने यापुर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमदवाराकडुन दिव्यांग आरक्षणाचा विकल्प घेणे. | दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ |
| ०२ | नव्याने समाविष्ट दिव्यांग तसेच नव्याने वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांसाठी उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविणे. | दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते २१ सप्टेंबर २०२१ |
| ०३ | पात्र उमेदवारांचे परिक्षा प्रवेश पत्र तयार करुन संबंधित उमेदवारांना डाऊलोड करण्यासाठी उपलब्ध करुन घेणे. | ०६ ऑक्टोबर २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२१ |
| ०४ | परिक्षेचे आयोजन<br>औषध निर्माता (दुपारी ०३.०० ते ०५.०० वाजता) | १६ ऑक्टोबर २०२१ |
| | आरोग्य सेवक (पुरुष), (सकाळी ११.०० ते ०१.०० वाजता)<br>आरोग्य सेविका (सकाळी ११.०० ते ०१.०० वाजता) | १७ ऑक्टोबर २०२१ |
| ०५ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिद्ध करणे/ उमेदवारांना Objection Filling साठी किमान ३ दिवसांचा वेळ देणे/ अंतिम निकाल जाहिर करणे/ पात्र उमेदवारांची यादी जाहिर करणे व त्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देणे | १८ ऑक्टोबर २०२१ ते १ नोव्हेंबर २०२१ |
| ०६ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिद्ध झाल्यानंतर Objection Filling चा कालावधी | Answer Key प्रसिद्ध झाल्यापासुन ३ दिवस |

| | | |
|---|---|---|
| **सदस्य सचिव तथा**<br>**जिल्हा आरोग्य अधिकारी**<br>**जिल्हा परिषद वाशिम** | **सदस्य**<br>**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)**<br>**जिल्हा परिषद वाशिम** | **अध्यक्ष जिल्हा निवड समिती**<br>**तथा**<br>**जिल्हाधिकारी वाशिम** |